व्यंकटेश महाविद्यालयाच्या बी.कॉम. (आय.टी.) विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा

व्यंकटेश महाविद्यालयातील बी.कॉम. (आय.टी.)च्या विद्यार्थ्यांसाठी बी.कॉम. (आय.टी.) विभागामार्फत बियाणी टेक्नॉलॉजी प्रा.लि.कोल्हापूर यांच्याशी असलेल्या सामंजस्य करारा अंतर्गत अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बी. कॉम. (आय.टी) भाग एक व भाग दोन च्या विद्यार्थ्यांनी बियाणी टेकनॉलॉजी प्रा. लि.कोल्हापूर या ठिकाणी भेट दिली. या अभ्यास भेटी दरम्यान माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) क्षेत्राची कामकाज प्रणाली, तेथे असणारे विविध विभाग, आयटी क्षेत्रात असणाऱ्या नोकरीच्या विविध संधी, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात उत्पादित केले जाणारी विविध उत्पादने याबाबत माहिती घेतली. तसेच विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन केले. सदर अभ्यास भेट यशस्वी करण्यात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने सर व उप-प्राचार्य प्रा. (डॉ.) एन. एम. मुजावर सर यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले. तसेच बी.कॉम. (आय.टी.) विभागाचे समन्वयक डॉ. प्रदीप गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या विभागाचे सहा. प्रा.श्री एस. एम.वंजीरे व सहा. प्रा. के.व्ही. जगनाडे मॅडम व श्री .महेश चौगुले यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

